" केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे "

अहमदनगर अपंग कल्याणकारी मंडळ, अहिल्यानगर

जानकीबाई आपटे मूक बधीर विद्यालय, अहिल्यानगर

# डॉ. कलाताई जोशी स्मृती करंडक स्पर्धा

## राज्यस्तरीय वाचा कौशल्य, चित्रवाचन स्पर्धा आणि शिक्षकांच्या अध्यापन कौशल्य स्पर्धा सन २०२४-२५

वाडिया पार्क, टिळक रोड, अहिल्यानगर – ४१४००१.फोन : ०२४१ २४७०३९७. Email : jankibaiapte.mookbadhir@gmail.com

जावक क्रमांक : २१३/२०२४-२०२५ दिनांक : ०५/१२/२०२४

प्रति,

मा. संस्थापक / संस्थाध्यक्ष

..............................................................

..............................................................

महोदय /महोदया,

सप्रेम नमस्कार,

कलाताई जोशी स्मृती करंडक स्पर्धेचे हे २३ वे वर्ष.

आमच्या संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा कै कलाताईचा २१ जानेवारी हा जन्मदिवस, त्यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा व कर्णबधिर विद्यार्थ्यांप्रती असलेली आस्था सदैव आमच्या सोबत असावी यासाठीच ही राज्यस्तरीय स्पर्धा आम्ही घेत आहोत. या स्पर्धेचे सस्नेह निमंत्रण देतांना आम्हास मनस्वी आनंद होत आहे. प्रथमतः संस्था व शाळा परिवारातील सर्व सदस्यांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

" कानाने बहिरा मुका परी नाही,
शिकविता भाषा बोले कैसा पाही "

"आवाज " ही कर्ण बधिरांच्या जीवनातील उणीव आपण आपल्या संस्थेतून भरून काढण्यासाठी प्रयत्नशील आहात. शिक्षण दळण नसून वळण आहे, वळण लावल्याशिवाय लागत नाही. त्यासाठी शिक्षकांनी नेहमी प्रयोगशील राहावे लागते.

शिक्षण हे कंटाळवाने न होता, रंजक झाले तर त्यात विद्यार्थी उत्स्फूर्तपणे आपणहून सहभागी होतात. आणि हाच उत्स्फूर्तपणा व निर्भिडपणा विद्यार्थ्यांच्या वाचा आणि भाषा या रुपाने आपणा सर्वासमोर या स्पर्धेद्वारे आणण्याचे व्यासपीठ उपलब्ध करुन देतांना मनस्वी आनंद होत आहे.जिंकण्याची उमेद निर्माण करणे हे आमचे ध्येय आहे. या कामी आम्ही निर्माण करून दिलेल्या या विशेष व्यासपीठाला आपल्या प्रत्यक्ष सहभागातून संस्थाचालक या नात्याने आपण बळकटी द्याल यात शंका नाही.

ज्ञान हे अमर्याद आहे, त्याला नाही मात्र ज्ञान कर्णबधिर मुलांना कसे देता व किती देता हे.मात्र शिक्षकांचे कौशल्य ! कर्णबधिर मुलांना शिकवतांना अनेक अडचणी येतात हे खरे आहे,पण या अडचणींवर आपल्या प्रयत्नातून शिक्षकांनी केलेली मात, त्यासाठी केलेले नवनवीन शैक्षणिक साहित्य निर्मिती त्यांच्या साह्याने अध्यापनात केलेले विविध प्रयोग व त्यासाठी केलेले प्रामाणिक प्रयत्न ते आपल्या सादरीकरणातून सर्वांसमोर मांडू शकतात.

सदर राज्यस्तरीय स्पर्धेत आतापर्यंत राज्यातून पालघर, रायगड, अमरावती, नागपूर, रत्नागिरी, सातारा, जालना, नागपुर, सांगली, कोल्हापूर, धुळे, पुणे, बीड, उस्मानाबाद, नाशिक, सोलापुर, छ.संभाजीनगर, मुंबई, सह अहिल्यानगर जिल्ह्यातील शाळांनी सहभाग घेतला होतात. आपल्या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांचा या वर्षी ही सहभाग नोंदवून राज्यस्तरीय स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावा ही विनंती. सदर स्पर्धेसाठी जाण्या - येण्याचा प्रवास खर्च वेतनेतर अनुदानातून खर्ची टाकण्यासाठीचे पत्र व उपस्थिती प्रमाणपत्र स्पर्धेच्या दिवशी देण्यात येईल.

आपण आमच्या विनंतीला मान द्याल,

आपल्या प्रतिसादाच्या अपेक्षेत.

(डॉ. विद्या जोशी )

अध्यक्ष

अहमदनगर अपंग कल्याणकारी मंडळ, अहिल्यानगर

" केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे "
अहमदनगर अपंग कल्याणकारी मंडळ, अहिल्यानगर
जानकीबाई आपटे मूक बधीर विद्यालय, अहिल्यानगर

# डॉ. कलाताई जोशी स्मृती करंडक स्पर्धा

## राज्यस्तरीय वाचा कौशल्य, चित्रवाचन स्पर्धा आणि शिक्षकांच्या अध्यापन कौशल्य स्पर्धा सन २०२४-२५

वाडिया पार्क, टिळक रोड, अहिल्यानगर – ४१४००१.फोन : ०२४१ २४७०३९७.Email : jankibaiapte.mookbadhir@gmail.com

जावक क्रमांक : २१३/२०२४-२०२५ दिनांक : ०५/१२/२०२४

प्रति,
मा. मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
.................................................................
.................................................................

महोदय /महोदया,
सप्रेम नमस्कार,
विषय : विद्यार्थ्यांच्या वाचा कौशल्य, चित्रवाचन व शिक्षकांच्या अध्यापन कौशल्य स्पर्धेत सहभागी होणे बाबत.

२१ जानेवारी डॉ. कलालाई जोशी यांच्या जन्मदिनी आम्ही दरवर्षी कर्णबधीर शाळेतील विद्यार्थ्यासाठी वाचा कौशल्य व चित्रवाचन या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करत आहोत या वर्षी स्पर्धा मंगळवार दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ठीक ९:०० ते ५:०० या वेळेत आमच्या विद्यालयात संपन्न होणार आहेत. प्रत्येक गटात विजेत्या पाच स्पर्धकांना स्मृती चिन्ह प्रमाणपत्र व रोख रक्कम अशी पारितोषिके सायंकाळी ४:३० वाजता होणाऱ्या पारितोषिक वितरण समारंभात प्रदान करण्यात येतील. तरी प्रत्येक गटाप्रमाणे सहा विद्यार्थी व दोन शिक्षक असा आपल्या विद्यालयाचा संघ पाठवून स्पर्धा यशस्वी करण्यास सहकार्य करावे ही विनंती.

वाचा कौशल्य व चित्रवाचन या दोन स्वतंत्र स्पर्धा आहेत, प्रत्येक वयोगटातून ४ विजेते स्पर्धक निवडले जातील. वाचा कौशल्य - १२, चित्रवाचन - १२ अशी एकूण - २४ बक्षीसे देण्यात येतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | १ | प्रथम क्रमांक | रुपये - १००१/- ₹ | प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह |
| द्वितीय क्रमांक | २ | द्वितीय क्रमांक | रुपये - ७०१/- ₹ | प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह |
| तृतीय क्रमांक | ३ | तृतीय क्रमांक | रुपये - ५०१/- ₹ | प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह |
| उत्तेजनार्थ क्रमांक | ४ | उत्तेजनार्थ क्रमांक | रुपये - ३०१/- ₹ | प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह |

### विद्यार्थी स्पर्धेचे स्वरूप थोडक्यात पुढील प्रमाणे.

**वयोगट :- ९ ते १२**

१) वाचा कौशल्य स्पर्धा :- स्पर्धक विद्यार्थाने आपल्या आवडीच्या विषयांवरील किमान ५ ते ७ ओळीच्या मजकुराचे वाचन करावे. उच्चार चेहऱ्यावरील नैसर्गिक हावभाव परीक्षक विचारात घेतील. (वेळ : १५ मिनिटे / गुण २०)

२) चित्रवाचन स्पर्धा :- स्पर्धक विद्यार्थ्याने पाठपुस्तकावर आधारीत २० चित्रापैकी १ चित्र दिले जाईल. त्या चित्राचे निरिक्षण करुन त्यात दिसणाऱ्या अनेक वस्तूपैकी कोणत्याही १० वस्तूंची अचूक नावे उत्तरपत्रिकेत लिहावी. (वेळ : १५ मिनिटे / गुण : २०)

**वयोगट :- १२ ते १५**

१) वाचा कौशल्य स्पर्धा :- स्पर्धक विद्यार्थ्याने आपल्या आवडीच्या विषयावरील किमान १० ते २० ओळींच्या मजकुराचे वाचन कराने उच्चार व चेहऱ्यावरील नैसर्गिक हावभाव परीक्षक विचारात घेतील. (वेळ : १५ मिनिटे / गुण २०)


२) चित्रवाचन स्पर्धा :- स्पर्धक विद्यार्थ्याला पाठ्यपुस्तकावर आधारीत २० चित्रापैकी १ चित्र दिले जाईल. त्याचे निरिक्षण करुन त्यावर आधारीत ५ प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे उत्तरपत्रिकेत लिहावी स्पर्धकांने प्रश्न समजून घेवून योग्य वाक्यात उत्तरे लिहावीत. स्पर्धकाला या वेळी कुठलेही मार्गदर्शन मिळणार नाही. (वेळ : १५ मिनिटे / गुण २०)

## वयोगट :- १५ ते १८

१) वाचा कौशल्य स्पर्धा :-स्पर्धक विद्यार्थ्याने कोणत्याही विषयावर किमान ४ ते ५ मिनिटे न चुकता, न अडखळता बोला, बोलणे कृत्रीम पाठांतरावर आधारीत निर्विकार नसावे बोलतांना जास्तीत जास्त नैसर्गिक स्वाभाविक हावभाव दिसावेत, ही फॅन्सीड्रेस स्पर्धा नाही, यासाठी वेशभूषा किंवा केशभूषेची आवश्यकता नाही. परंतु डॉक्टर, पोष्टमन, भाजीवाला अशी कोणतीही एक व्यक्तिरेखा अभिनय, बोलणे, आवाजातील चढउतार, सुलभता व आत्मविश्वास या बाबी परीक्षक विशेष करून लक्षात घेतील.

२) चित्रवाचन स्पर्धा :- स्पर्धकाला पाठ्यपुस्तकावर आधारीत २० चित्रापैकी १ चित्र दिले जाईल. चित्राचे निरिक्षण करुन त्यावर आधारीत १० अचूक व अर्थपूर्ण वाक्ये उत्तरपत्रिकेत लिहावेत.स्पर्धकाने कोणाच्याही मदतीशिवाय स्वतः वाक्य रचना करावी. (वेळ : १५ मिनिटे / गुण २०)

( सुचना : वरील तीनहीं वयोगटाच्या स्पर्धकासाठी उदाहरण म्हणून खालील चित्र देत आहोत. )



| वयोगट ९ ते १२ | वयोगट १२ ते १५ | वयोगट १५ ते १८ |
|---|---|---|
| १) सायकल<br>२) धान्याचे पोते<br>३) फुगे<br>४) केळी<br>५) टरबूज<br>६) ऊस<br>७) पक्षी<br>८) मोटारगाडी<br>९) झाड<br>१०) पिशवी | प्र.१) सायकल कोण चालवीत आहे ?<br>उत्तर : सायकल मुलगा चालवीत आहे.<br>प्र.२) फळ विक्रेता कोण कोणती फळे विकत आहे ?<br>उत्तर : फळ विक्रेता केळी, पेरु, सफरचंद, आंबे, टरबुज, ही फळे विकत आहे.<br>प्र. ३) दुकानात धान्याचे किती पोते आहेत ?<br>उत्तर : दुकानात धान्याचे दोन पोते आहेत.<br>प्र.४) पक्षी कोठे बसले आहे ?<br>उत्तर : पक्षी मंडपावर बसले आहे.<br>प्र.५) खेळणीच्या दुकानात कोणकोणत्या वस्तु आहेत ?<br>उत्तर : खेळणीच्या दुकानात चेंडू, बाहुली, रेल्वेगाडी, बॅट या वस्तू आहेत. | १) आईच्या हातात पिशवी आहे.<br>२) दुकानदाराच्या डोक्यावर टोपी आहे.<br>३) टोपलीत विविध फळे आहे.<br>४) मुलगा सायकल चालवीत आहे.<br>५) दुकानाच्या मागे झाडी आहे<br>६) आईच्या हातात चेंडू आहे.<br>७) पोत्यात धान्य आहे.<br>८) सायकल शेजारी मोटार गाडी आहे.<br>९) मंडपावर पक्षी बसले आहे.<br>१०) बाजारात खेळणी, फळे, किराणा, कपडे यांची दुकाने दिसत आहेत. |

## कर्णबधिर विद्यालयातील विशेष शिक्षक, कला शिक्षक यांच्या राज्यस्तरीय अध्यापन कौशल्य स्पर्धा

कर्णबधिर विद्यालयातील विशेष शिक्षक, कला शिक्षक यांची विचारशक्ती, अध्यापनातील अनुभव, अध्यापनात येणाऱ्या समस्या या सारख्या अनेक बाबीनां व्यक्त करण्यासाठी खुले व्यासपीठ प्राप्त व्हावे या उद्देशाने आम्ही अहमदनगर अपंग कल्याणकारी मंडळाचे जानकीबाई आपटे  मूक बधीर विद्यालय, अहिल्यानगर यांचे वतीने सन २००१ या वर्षापासून डॉ. कलाताई जोशी स्मृती करंडक स्पर्धेचे आयोजन करत आहोत.

सदर अध्यापन कौशल्य स्पर्धेत शिक्षकाने कोणताही एक विषय अथवा घटक निवडून त्यावर शिक्षकाने सदर घटकाचा उद्देश, त्याची मांडणी, त्यासाठी लागणारे शैक्षणिक साहित्याचे उपयोजन व ते मुलांसाठी किती प्रभावी या सर्व बाबी स्पर्धक शिक्षकाने लक्षात घेऊन घटक दिलेल्या वेळेत ( १० ते १५ मिनिटात ) परीक्षकांसमोर मांडायचा आहे. समोर मा.परीक्षक, इतर स्पर्धक असतील, हेच मुले समजून आपण अध्यापन करु शकता. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहिल.

बुधवार दिनांक १५.०१.२०२५ पर्यंत सोबतच्या प्रवेशिकेत स्पर्धक शाळेने व शिक्षकाने  मोबाइल नंबर ई-मेल आयडी (पत्ता,मोबा.नंबर माहिती सविस्तर लिहून ही प्रवेशिका पाठवावी.) सदर स्पर्धेत शिक्षकांना वैयक्तिकरीत्या सुध्दा सहभाग नोंदवता येईल.विजेत्या स्पर्धकांना खालील प्रमाणे बक्षिस देण्यात येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रथम क्रमांक | रुपये - ९९९९/- ₹ | प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह |
| | द्वितीय क्रमांक | रुपये - ७७७७/- ₹ | प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह |
| | तृतीय क्रमांक | रुपये - ५५५५/- ₹ | प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह |

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ४.३० संपन्न होईल. आपल्या विद्यालयातील शिक्षकांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती.

विद्यार्थी स्पर्धा तसेच शिक्षक स्पर्धा विषयी कोणतीही शंका निर्माण झाल्यास मुख्याध्यापक श्री आरोटे विजय मुरलीधर, मोबा.- ९३२५१०१९९४ यांच्याशी संपर्क करावा.

### स्पर्धेचे नियम व अटी

- स्पर्धक विद्यार्थी कर्णबधिर असावा. तशा आशयाचे प्रमाणपत्र, श्रवणालेख, जन्म तारखेचा दाखला साक्षांकित केलेली प्रत स्पर्धेपूर्वी संयोजकांना सादर करावी, त्याशिवाय विद्यार्थी स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही.
- वाचाकौशल्य / चित्रवाचन या दोन स्पर्धा आहेत. यातून विजेता स्पर्धक निवडला जाईल.
- वाचाकौशल्य / चित्रवाचन या दोन स्पर्धा आहेत. यासाठी स्वतंत्र स्पर्धक असावा,
- वाचा कौशल्य स्पर्धेचे स्क्रीप्ट ३ प्रतीत आणावे लागतील.
- प्रत्येक वयोगटातील ३ याप्रमाणे वाचा कौशल्य व चित्रवाचनसाठी असे तिन्ही वयोगट मिळून एकूण ६ स्पर्धक सहभाग घेवू शकतील.
- वाचा कौशल्य स्पर्धासाठी वेळ ५ मिनिटे, गुण २० असतील आणी चित्रवाचन स्पर्धेसाठी वेळ १५ मिनिटे, गुण २० असतील. स्पर्धकाला लेखनासाठी उत्तर पत्रिका देण्यात येईल.
- विद्यार्थ्यांने शाळेचे ओळखपत्र, लेखन साहित्य, पेन, पॅड, इत्यादी सोबत आणावे.
- स्पर्धा मंगळवार दिनांक २१.०१.२०२५ रोजी सकाळी ठिक ९.०० वाजता अगदी वेळेवर सुरु होईल.
- स्पर्धेच्या दिवशी स्पर्धकांसाठी या नाष्टा, भोजन याची व्यवस्था केली आहे, स्पर्धेच्या एक दिवस अगोदर मुक्कामी घेणाऱ्या स्पर्धक शाळांनी, शिक्षकांनी निवास व भोजन व्यवस्था करण्यासाठी पूर्व कल्पना देणे आवश्यक आहे.
- परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल व तो सर्वांना बंधनकारक राहील.
- प्रवेशिकेत स्पर्धक विद्यार्थ्यांची नावे भरुन बुधवार दिनांक १५.०१.२०२५ पर्यंत पाठवावी.
- स्पर्धेची प्रवेशिका, पोष्टाने, कुरियर, व्हॉटस्अप अथवा शाळेच्या ई-मेलवर
- Jankibaiapte.mookbadhir@gmail.com स्विकारली जाईल.
- स्पर्धेचे परिपत्रक janiibaiapte. mookhadhir gmail.com Facebook वर उपलब्ध आहे.

- स्पर्धेतील विद्यार्थी सहभाग व शिक्षक सहभागाची एकत्र अथवा स्वतंत्र दोन पाकिटे पाठवू शकता. पाकिटावर विद्यार्थी
- वाचा कौशल्य-चित्रवाचन स्पर्श शिक्षक अध्यापन कौशल्य स्पर्धा सहभाग असा स्पष्ट उल्लेख असावा.
- स्पर्धेसाठी येणाऱ्या शिक्षक व विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च अनुज्ञेय होण्यासाठी व स्पर्धेचा कालावधी ऑनडयुटी करण्यासाठी मा. आयुक्त दिव्यांग कल्याण, पुणे यांच्या आदेशाची प्रत स्पर्धेच्या दिवशी मंगळवार दि. २१ जानेवारी २०२५ रोजी आपणास देण्यात येईल.

**दोन्ही स्पर्धा निपक्ष, पारदर्शक व स्नेहपूर्ण वातावरणात संपन्न होतील यासाठी संयोजक वचनबध्द आहेत.**

| स्पर्धे विषयीची अधिक माहिती स्पर्धा प्रमुख : श्री.कर्पे सहदेव मधुकर, मोबा. ९८६०३०९१८७ |
|---|

| संपर्कासाठी पत्ता |
|---|
| मा. मुख्याध्यापक,<br>जानकीबाई आपटे मूक बधीर विद्यालय, अहिल्यानगर<br>वाडिया पार्क, टिळक रोड, अहिल्यानगर ४१४००१.<br>फोन - (०२४१) २४७०३९७ . |
| Email - jankibaiapte.mookbadhir@gmail.com |

" केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे "

अहमदनगर अपंग कल्याणकारी मंडळ, अहमदनगर

जानकीबाई आपटे मूक बधीर विद्यालय, अहमदनगर

# डॉ. कलाताई जोशी स्मृती करंडक स्पर्धा

## राज्यस्तरीय वाचा कौशल्य, चित्रवाचन स्पर्धा आणि शिक्षकांच्या अध्यापन कौशल्य स्पर्धा सन २०२४-२५

## प्रवेशिका

**वाचाकौशल्य व वित्रवाचन स्पर्धा सहभागी विद्यार्थी व अध्यापन कौशल्य स्पर्धा सहभागी शिक्षक यादी सन २०२४-२५**

| | |
|---|---|
| संस्थेचे नाव | |
| शाळेचे नाव | |
| शाळेचा पत्ता | ........................................................................................................<br>........................................................................................................ |
| फोन नंबर | |
| ई- मेल | |

### 1. वाचाकौशल्य स्पर्धा

| अ.नं | वयोगट | विद्यार्थ्यांचे नाव | जन्म तारीख | श्रवणऱ्हास |
|---|---|---|---|---|
| १ | ९ ते १२ | | | |
| २ | १२ ते १५ | | | |
| ३ | १५ ते १८ | | | |

### 2. चित्रवाचन स्पर्धा

| अ.नं | वयोगट | विद्यार्थ्यांचे नाव | जन्म तारीख | श्रवणऱ्हास |
|---|---|---|---|---|
| १ | ९ ते १२ | | | |
| २ | १२ ते १५ | | | |
| ३ | १५ ते १८ | | | |

### 3. अध्यापन कौशल्य स्पर्धा

| | |
|---|---|
| शिक्षकाचे नाव | |
| स्पर्धेतील विषय | |
| शाळेचा पत्ता | ........................................................................................................<br>........................................................................................................ |
| फोन नंबर | |
| ई- मेल | |

मोबा.नंबर :

मुख्याध्यापकाची सही व शिक्का